# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः 28.11.2024** **वारःगुरुवार**

---

1.'बाल विवाह मुक्त भारत' या राष्ट्रीय अभियानाला कालपासून प्रारंभ
2.महाराष्ट्रात नवीन मुख्यमंत्र्यांचं नाव अद्याप जाहीर नाही, मात्र भाजपाच्या वरिष्ठ नेतृत्वाचा निर्णय मान्य करण्याची शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांची ग्वाही
3.हेमंत सोरेन चौथ्यांदा झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाची आज शपथ घेणार
4.जसप्रीत बूमराह आय सी सी कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत पुन्हा अव्वलस्थानी
आणि
5.फेंगल चक्रीवादळाचा श्रीलंकेला फटका, देशाच्या दक्षिण किनारपट्टीलाही तडाखा बसण्याची शक्यता.

**<u>बाविमुभा-</u>**

'बाल विवाह मुक्त भारत' या राष्ट्रीय अभियानाची केंद्र सरकारनं काल नवी दिल्लीत सुरुवात केली. भारताला बालविवाहमुक्त राष्ट्र बनवणं हा या मोहिमेचा प्राथमिक उद्देश आहे. सरकारनं ही मोहिम केंद्रित पद्धतीनं राबविण्यासाठी 130 जिल्हे निश्चित केले असल्याचं महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी या मोहिमेचा शुभारंभ करताना सांगितलं. बालविवाह हा केवळ फौजदारी गुन्हा नसून मानवी हक्कांचं उल्लंघन आहे असं सांगून मंत्री म्हणाल्या की, बाल विवाह मुक्त भारत मोहीम हा केवळ काही दिवसांचा कार्यक्रम नसून एक निरंतर प्रयत्न आहे आणि भारत बालविवाहापासून मुक्त होईपर्यंत तो सुरू राहील. अन्नपूर्णा देवी यांनी बालविवाहमुक्त भारत पोर्टलचं अनावरणही केलं. जागरूकता वाढवणं, बालविवाह रोखणं आणि बालविवाहाच्या घटनांची प्रभावीपणे नोंद करणं याद्वारे मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी हे ऑनलाइन व्यासपीठ विकसित केलं आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणाईला 'विकसित भारत युवा नेतृत्व संवाद' या प्रश्नमंजुषेत भाग घेण्याचं आवाहन केलं आहे. विकसित भारत ही स्पर्धा चार टप्प्यात होणार असून, त्यात, १५ ते २९ वयोगटातल्या व्यक्तीला भाग घेता येईल. २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या डिजिटल प्रश्नमंजुषेने या स्पर्धेला सुरुवात होईल. आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना सरकारपर्यत पोचवण्यासाठी युवकांना मिळणारी ही मोठी संधी आहे असं पंतप्रधानांनी आपल्या समाजमध्यमांवरील संदेशात म्हंटलं आहे.

**<u>महाराष्ट्र</u>**

महाराष्ट्रात अद्यापही नवीन मुख्यमंत्र्यांचं नाव जाहीर झालेलं नाही. सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या आमदारांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते गृहमंत्री अमित शहा यांची काल नवी दिल्लीत भेट घेतली. मात्र या बैठकीत सत्ता स्थापनेबाबत चर्चा झाली नसल्याचं शिवसेनेचे नेते केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितलं. भाजपचं वरिष्ठ नेतृत्व, अर्थात, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा जो निर्णय घेतील, तो आम्हाला पूर्णपणे मान्य असेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाण्यात पत्रकारांशी बोलतांना स्पष्ट केलं.
तर, पक्षश्रेष्ठींसोबत चर्चेद्वारे सर्व निर्णय घेतले जातील असं उप-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुर इथं माध्यमांशी बोलताना सांगितलं.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवारही दिल्लीत दाखल झाले असून सत्ता स्थापनेबद्दल खेळीमेळीनं निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली.

महायुतीच्या घटक पक्षांच्या नेत्यांची आज अमित शहा यांच्याबरोबर संयुक्त बैठक होणार असून त्यानंतर सरकार स्थापनेबद्दल चित्र स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

**<u>इव्हीएम</u>**

दरम्यान, निवडणुका ई व्ही एम मशीनवर न घेता, मतपत्रिकेवर घ्याव्यात या प्रमुख मागणीसाठी कॉंग्रेस पक्षाकडून सह्यांची मोहीम राबवली जाणार आहे. कॉंग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक काल मुंबईत झाली. पक्षाचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना देण्यात आल्याचं बैठकीनंतर सांगण्यात आलं.

**<u>भाजपा</u>**

तर, निवडणूकीत हरल्यानंतर इव्हीएमला जबाबदार धरून कॉंग्रेस जनादेशाचा अनादर करत असल्याची टीका भाजपाचे प्रवक्ता संबित पात्रा यांनी काल नवी दिल्लीत केली.

**<u>संसद</u>**

अदानी उद्योग समूहाच्या लाचखोरीचं प्रकरण आणि अन्य विविध मुद्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज काल दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर सभागृहात अदानी प्रकरण तसंच उत्तर प्रदेश आणि मणिपूरमधला हिंसाचार या मुद्द्यांवरून गदारोळ झाला. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांनी सभागृहाचे शिष्टाचार आणि प्रतिष्ठा राखण्याची वारंवार विनंती केली. मात्र, विरोधकांनी घोषणाबाजी सुरूच ठेवल्यामुळे, सभागृहाचं कामकाज आधी दुपारी १२ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत, सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यानंतर अध्यक्ष जगदीप धनखड यांनी अदानी लाचखोरी प्रकरण, तसंच उत्तरप्रदेशातल्या संभल आणि मणिपूर हिंसाचार प्रकरणी विरोधकांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव फेटाळला. त्यांनी सदस्यांना चर्चा करून सभागृहाचं कामकाज सुरू  ठेवण्याचं आवाहन केलं, मात्र, गोंधळ सुरु राहिल्यानं राज्यसभेचं कामकाज प्रथम साडे अकरा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, उद्योगपती गौतम अदानी यांना अटक करण्याची मागणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे.

**<u>सोरेनशपथविधी</u>**

झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते, हेमंत सोरेन आज झारखंडचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री म्हणून चौथ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. आज संध्याकाळी रांची इथे होणाऱ्या शपथविधी समारंभात राज्यपाल संतोष कुमार गंगवार, सोरेन यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. काँग्रेस अध्यक्ष मलिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह मेघालय, पंजाब आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री देखील या समारंभाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**<u>इफफी</u>**

गोव्यात सुरू असलेल्या 55 व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फीचा आज समारोप होणार आहे. काल झालेल्या ‘लता मंगेशकर मेमोरियल टॉक: म्युझिकल थिएटर इन इंडिया’ या कार्यक्रमात प्रसिद्ध संगीतकार ए. आर. रहमान यांनी सहभाग घेतला. तसंच काल देशी-विदेशी मिळून एकंदर 75 चित्रपटांचं प्रदर्शन करण्यात आलं.

**<u>ओटीटीकायदे</u>**

समाज माध्यमं आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रसारित होणारा अश्लील मजकूर रोखण्यासाठी सध्याचे कायदे आणखी मजबूत आणि कठोर करण्याची आवश्यकता असल्याचं प्रतिपादन  केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. ते काल लोकसभेत पुरवणी प्रश्नांना उत्तर देत होते. आपल्या देशाची संस्कृती आणि हे प्लॅटफॉर्म जिथून आले आहेत त्या देशांत खूप फरक आहे, त्यामुळे, संसदेच्या संबंधित स्थायी समितीने हा मुद्दा उचलून धरावा आणि त्यासाठी कठोर कायदे करावेत अशी मागणी त्यांनी केली.

**<u>गरीब</u>**

देशातील 80 कोटी लोकांना प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत समाविष्ट केलं असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण राज्यमंत्री निमुबेन बांभनिया यांनी काल लोकसभेत सांगितलं. योजना पुढील पाच वर्षे सुरू ठेवण्यासाठी कोणतेही सर्वेक्षण केलेलं नाही तथापि, गरीब लाभार्थ्यांचा आर्थिक भार दूर करण्यासाठी, मोफत अन्नधान्य वितरणाचा कालावधी यावर्षी जानेवारीपासून आणखी पाच वर्षांसाठी वाढवण्यात आला आहे.

**<u>लोस</u>**

देशात सुमारे 59 हजार वक्फ मालमत्तांवर अतिक्रमण होत असल्याचं केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितलं. वक्फ कायद्याच्या कलमांनुसार, राज्य वक्फ मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना वक्फ मालमत्तेवरील अनधिकृत धंदे आणि अतिक्रमणावर कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार आहे.

**<u>गोयल</u>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी फ्रान्स आणि आशिया-पॅसिफिक भागीदार देशांनी परस्पर सहकार्य वाढवण्याचं आवाहन केलं आहे. ते काल नवी दिल्लीत, आशिया-पॅसिफिक क्षेत्रासाठीच्या, फ्रेंच विदेशी व्यापार आयुक्तांच्या वार्षिक परिषदेत बोलत होते. यामध्ये द्विपक्षीय करार आणि बहुपक्षीय मंचांद्वारे व्यापार संबंध वाढवणे, हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तांत्रिक सहकार्य मजबूत करणे आणि सांस्कृतिक आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढवणे यांचा समावेश आहे. 2024-25 या आर्थिक वर्षात भारत आणि फ्रान्स देशांमधील व्यापार 15 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल, अशी आशा गोयल यांनी यावेळी व्यक्त केली.

**<u>अटल-लॅब-पूल-मक्षी</u>**

नीति आयोगाच्या अटल इनोव्हेशन मिशन अंतर्गत देशभरात स्थापन केलेल्या 10 हजार अटल टिंकरिंग प्रयोगशाळांपैकी 5 हजार 692 प्रयोगशाळा ग्रामीण भागात आहेत. यातील एक हजार 22 एटीएल आकांक्षी जिल्ह्यांमध्ये स्थापित आहेत, तर 375 आकांक्षी खंडांमध्ये आहेत. अटल प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनाशक्तीचा विस्तार करण्यासोबत नाविन्यपूर्ण कौशल्यंही शिकवली जातात.

**<u>बूमराह</u>**

भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह पुरुषांच्या कसोटी गोलंदाजांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अर्थात आय सी सी च्या क्रमवारीत पुन्हा एकदा अव्वल स्थानी आला आहे. बुमराहने 11 गुण मिळवत, दक्षिण आफ्रिकेच्या कागिसो रबाडाला मागे टाकत पहिलं स्थान पटकावलं आहे. नुकत्याच पर्थ मध्ये झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीत त्याने केलेल्या चमकदार कामगिरीमुळे त्याला अव्वल मानांकन मिळण्यास मदत झाली.

फेंगलवादळ

बंगालच्या उपसागरात नैऋत्य दिशेला निर्माण झालेल्या फेंगल या चक्रीवादळचा श्रीलंकेला फटका बसला असून, चक्रीवादळामुळे आतापर्यंत चार जण मृत्युमुखी पडले आहेत. चक्रीवादळामुळे प्रभावित झालेल्या भागात श्रीलंकेची नौदल आणि हवाई दलाची पथके मदतकार्य करत आहेत.

**<u>चक्रीवादळ</u>**

नैऋत्य बंगालच्या उपसागरात, श्रीलंकेच्या उत्तर किनाऱ्याजवळ कमी दाबाचा पट्टा तयार झाला असल्यामुळे येत्या शनिवारपर्यंत तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि आंध्र प्रदेशच्या किनारी भागात अतिवृष्टीची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या कमी दाबाच्या पट्टयाचं चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता असल्याचं हवामान खात्याचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितलं. हे चक्रीवादळ शनिवारी सकाळच्या सुमारास उत्तर तामिळनाडू किनारपट्टीजवळ प पोहोचेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मच्छीमारांनी बंगालच्या उपसागरात, श्रीलंकेचा किनारा, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर जाऊ नये असा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

संभाव्य चक्रीवादळच्या पार्श्वभूमीवर, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टालिन यांनी काल जिल्हाधिकारी आणि अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन राज्यातील खबरदारीच्या उपायांचा आढावा घेतला. तिरुवरूर, मायिलादुथुराई, नागपट्टणम् आणि कुड्डलोर जिल्ह्यात राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथकं तैनात करण्यात आली आहेत.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**